क्रमांक :९९२८ क-२ (संगणक) कक्ष,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : ०८ जून, २०२६

## :: परिपत्रक ::

विषय :- विधीमंडळाच्या अधिवेशनातील संसदीय आयुधांची प्रंलबित निवेदने/उत्तरे निकाली काढण्याच्या दृष्टीने मंत्रालयीन विभागांनी संसदीय आयुधांची माहिती या सचिवालयाकडून पडताळणी करुन घेण्याबाबत.

सर्व मंत्रालयीन विभागांना निदेशानुसार कळविण्यात येते की, विधानमंडळाने सर्व संसदीय आयुधांवर कार्यवाही करण्यासाठी संगणकीय प्रणाली तयार केलेली आहे. सन्मा. विधानसभा सदस्यांकडून संसदीय आयुधांच्या सूचना स्वीकारणे, प्राप्त सूचनांवर मान्यतेची कार्यवाही करणे, उत्तरासाठी मंत्रालयीन विभागाकडे पाठविणे, विभागाकडून संगणकीय प्रणालीद्वारे प्राप्त संसदीय आयुधांची निवेदने/उत्तरे सादर करणे इत्यादी संपूर्ण कार्यवाही या संगणकीय प्रणालीव्दारे करण्यात येते. तसेच आवश्यकतेनुसार संसदीय आयुधांची निवेदने/उत्तराच्या प्रती या सचिवालयाकडून स्वीकरण्यात येतात. संसदीय आयुधांची प्रलंबित निवेदने / उत्तरे यासंदर्भात प्रत्येक महिन्यात या सचिवालयाकडून विभागाला स्मरणपत्र पाठविण्यात आलेली असतानाही सन २०२४ चे पाचवे (हिवाळी) अधिवेशन ते सन २०२६ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील काही विभागांची निवेदने / उत्तरे अद्यापही प्रलंबित आहेत. याबाबत प्रत्येक अधिवेशनात विधानसभा सभागृहात सन्मा.सदस्यांकडून वारंवार मुद्दा उपस्थित करण्यात येतो.

त्यानुषंगाने संसदीय आयुधांची प्रलंबित निवेदने/उत्तरांची विभाग व आयुधनिहाय सविस्तर माहिती सर्व विभागांना तसेच त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना एकत्रित स्वरुपातील अद्ययावत माहिती तातडीने उपलब्ध व्हावी यासाठी **स्वयंचलित विवरण प्रणाली** (Real Time Dash Board) तयार करण्यात आली असून सन २०२६ च्या द्वितीय (पावसाळी) अधिवेशनापूर्वी सदरहू प्रणाली कार्यान्वित करण्यात येणार आहे. या प्रणालीवरील प्रलंबित आयुधांची पडताळणी केली असता निदर्शनास आले की, काही मंत्रालयीन विभागांनी निवेदने / उत्तरे संगणकीय प्रणालीद्वारे सादर न करता त्याच्या प्रत्यक्ष प्रती या सचिवालयास पाठविलेल्या आहेत. तर काही विभागांनी प्रलंवित निवेदने / उत्तरे संगणकीय प्रणालीद्वारे सादर केली असून त्याच्या प्रत्यक्ष प्रती या सचिवालयास पाठविलेल्या नसल्याने या प्रणालीवरील संसदीय आयुधांची प्रलंबित निवेदने/उत्तरांची अचूक आकडेवारी जुळत नाही.

संसदीय आयुधांची प्रंलबित निवेदने/उत्तरे निकाली काढण्याच्या दृष्टीने संसदीय आयुधांची अचूक माहिती तात्काळ या प्रणालीवर उपलब्ध होण्यासाठी विभागांच्या समन्वय कक्षातील एका प्रतिनिधीने सन २०२४ चे पाचवे (हिवाळी) अधिवेशन ते सन २०२६ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील त्यांच्याकडे प्रलंवित असलेल्या संसदीय

आयुधांच्या माहितीसह या सचिवालयातील संसदीय आयुधे हाताळणाऱ्या संबंधित ( फ (सूचना) कक्ष, ब (विधानसभा प्रश्न) कक्ष, ई-१ (विधानपरिषद प्रश्न) कक्ष व ई-२ (विधानपरिषद विधीविधान) कक्ष) कक्षात प्रत्यक्ष येऊन तातडीने उक्त माहितीची पडताळणी करावी. तसेच यापुढे संसदीय आयुधांची निवेदने/उत्तरे संगणकीय प्रणालीद्वारे सादर केल्यानंतर त्याचवेळी निवेदनांच्या /उत्तरांच्या प्रत्यक्ष प्रती देखील अभिलेख्यात ठेवण्यास्तव या सचिवालयास शीघ्रतेने पाठविण्याची दक्षता सर्व मंत्रालयीन विभागांनी घ्यावी.

( शिवदर्शन साठ्ये )
सचिव-४
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

याची प्रत :-

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.
२) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
३) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव
४) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
५) मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
६) मा. संसदीय कार्य मंत्री यांचे खाजगी सचिव
७) सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
८) मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक
९) सचिव- १, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
१०) सचिव- २, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
११) सचिव- ३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
१२) सचिव- ४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
१३) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
१४) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी तथा कार्यवाहीसाठी अग्रेषित
१५) संगणक कक्ष (Website)
१६) एम.के.सी.एल.